VOL- IX ISSUE- IX SEPTEMBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# शेतकऱ्याची व्यथा सांगणाऱ्या मराठीतील काही निवडक कविता

**डॉ. संजय जनार्दन आगलावे**
सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग)
जे. डी. पाटील महाविद्यालय दर्यापूर
ई-मेल-aglawesanjaysir@gmail.com

शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो, किंबहुना भारत हा कृषिप्रधान देश आहे, असे मानले जाते. एक काळ होता ज्यावेळी शेती हा उत्तम व्यवसाय मानला जाई. या शेती व्यवसायावर मोठ मोठे कुटुंब वर्षानुवर्षे पोसले जात होते. जो शेती व्यवसायावर आपले उदरनिर्वाह करतो तो सुखी मानला जाई. साहित्य हा समाजाचा आरसा असतो मराठी साहित्यामध्ये सुरवातीला जे कृषी संस्कृतीचे जे चित्र आले आहे, ते गावात आनंदात राहणारा शेतकरी त्याचे कुटुंब त्याचा गोतावळा यांचे चित्रण येत होते. शेती व्यवसाय करतांना येणाऱ्या समस्यांचे चित्रण फारसे येत नव्हते, कालांतराने शेती व्यवसाय संकटग्रस्त झाला. त्यावर निर्वाह करणे कठिण झाले. मराठी साहित्यात सुरवातीला जे चित्रण आले हे मुख्यता खेड्यांतून आलेल्या, पण शहरात राहणाऱ्या मध्यम वर्गीय पांढरपेशा कवी साहित्यिकांनी केलेले आहे. त्याचा प्रत्यक्ष शेतीशी संबंध नव्हता. ज्यांच्या कडे मालगुजारी किंवा जे खोत होते त्यांच्याच. पैकी हे बहुतेक होते. त्यांनी त्यांच्या अनुभवातून आणि समजूतीतुन शेतीचे चित्रण केले. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाची संधी अठरा पगड जातीतील लोकांना मीळू लागली. यामध्ये प्रत्यक्ष शेती व्यवसाय करणारा कुणबी हा होता. या व्यवसायाशी निगडीत इतर जातींतील माणसे यातील काही जण लिहिते झाले, आणि शेती व्यवसायाच्या समस्यां त्यामधून यायला लागल्या. शेतकऱ्यांचे संघटन सुद्धा उभे झाले. शेतकरी नेते सुद्धा वेगवेगळ्या भागातून उदयास आले. शेतकरी नेते सुद्धा वेगवेगळ्या भागातून शेतकऱ्यांचे नेतृत्व करू लागले. यातुन अनेक आंदोलने झाली. यावर चर्चा होवू लागल्या साहित्यामध्ये सुद्धा शेतकऱ्यांचे जीवन त्याचा संघर्ष येवू लागला. मराठी साहित्यात विशेषत कवितेत शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे, अन्नदाता आहे, कृषी संस्कृती ही आपली मुळ संस्कृती आहे, हा विचार यायला लागला शेतकरी जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या अनेक कविता मराठी मध्ये लीहील्या गेल्या आहेत.

विठ्ठल वाघ यांची शेतकऱ्यांच्या जीवनाचे दर्शन घडविणारी सुप्रसिद्ध कविता 'तिफन' गाण्याच्या रूपात आलेली आहे. विठ्ठल वाघ हे वऱ्हाडातील लोकप्रिय कवी आहेत. शेतात तिफन चालवीणाऱ्या पती पत्नी चे चित्रण या कवितेत केले आहे. पत्नी पत्नीच्या नात्यातील गोडवा, सोबत शेतावर श्रम करतांना मनातील भाव निसर्गातील रंग गंध संवेदना यांचे घडणारे सहज सुंदर दर्शन आनंद देणारे आहे. पुर्वी पेरणी करण्यासाठी तिफण हे कृषी अवजार वापरले जात होते. बैलाच्या सहाय्याने तिफण शेतामध्ये चाललेले आहे. याचे सुंदर चित्र कविने उभे केले आहे.

*काळ्या मातीत मातीत, तिफण चालते।*
*इज थरथर नाचते, ढग ढोल वाजविते॥*

सदाशिव हाकरतो नंदि शेतकऱ्यांला शंकर म्हटलेले आहे. ही जणू शंकर पार्वतीची जोडी आहे. आणि सोबत बैल म्हणजे नंदी आहे. पार्वती आपल्या

ओटीत बीज घेवून आहे. माती आणि माता हे दोन्ही ना सृजन शक्ती निसर्गाने बहाल केली आहे. सरीवर सर येतात मातीचा कस्तुरी सारखा सुगंध सर्वत्र दळवळतो राघु आणि मैनेचा श्रृंगार सुद्धा या कवितेमध्ये येतो.

*भुलं जिवाला पडते।*
*वाट राघुची पाहते।*
*राघु तिफण हाणतो।*
*मैना वाटूती पाहते।*

त्यांचे तान्हुले बाळ झोळीत झाडाला टांगून, ही माऊली राबराब राबत आहेत. बाळाला आईची गरज आहे, पण त्याला सोडून ती राबत आहेत घामाच्या अभिषेकान निसर्ग देवतेचे पूजन चाललेले आहे. पिक हालति डुलती जणू भजन करीत आहेत, तिच्या मेहनतीमुळे सोनं चांदी लकाकते, चांदी सारखी कपाशी फुलते, पेरणी करताना पाणी भिजल ठेकुन पायाला लोण्यासारखे वाटते, या ढेकलातून तो पिकांचे स्वप्न बघतो पण त्याचे स्वप्न सहज साकार होत नाही. डोळ्यात स्वप्न आणि पायात काटा रूतती लाल रक्त सांडते शेतकरी रक्ताचे पाणी करतो तेव्हाच हिरवे स्वप्न साकार होते शेतकऱ्यांचे भावविश्व अतिशय चित्रमय पद्धतीने या कवितेत साकारले आहे.

शेतकरी हा अन्न दाता आहे, जगाच्या पोशिंदा आहे ही भावना आपल्या कविते मध्ये बहिणाबाई चौधरी यांनी सांगितले आहे. त्यांचा जन्म खानदेशातील शेतकरी कुटुंबामध्ये झाला. शेतकरी जीवन त्यांनी जवळून अनुभवले त्यांच्या बऱ्याच कविता मधून कृषी संस्कृतीचे चित्रण आले आहे. त्यामधून मानवी मनाचा ठाव त्या सहजतेने घेतात. "मोट हाकलतो एक" या कवितेत शेतकऱ्यांच्या जीवनाचे दर्शन घडवत असतानाच त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्याचा "मोठ हाकलतो एक" या कवितेत त्या म्हणतात,

*उतरणी चढणीचे।*
*नाव दोन घाव एक।*
*मोट हाकलतो एक।*
*जीव पोसतो कितीक।*

शेतकरी अनेकांना पोशिंदा आहे आपल्या जागतिकीकरणाचा परिणाम जिवनाच्या सर्व भागावर झाला. जिवनाचे संदर्भ त्यात बदलले जागतिकीकरणाची लाट थोपवणे शक्य नाही. या जागतिकीकरणाचा परिणाम मोठ्या संख्येने शेतकरी, शेतमजूर, आदीवासी, कष्टकरी आणि उपेक्षित वर्गावर होवू लागला त्यांच्या जगण्याचा प्रश्न त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न अधिक तीव्र होवू लागला. शेतकरी दिवसेंदिवस कर्जबाजारी होऊ लागला. त्यातून तो आत्महत्ये सारखे टोकाची पावले उचलायला लागले. शेतकरी आत्महत्यांची चर्चा मोठ्या प्रमाणात व्हायला लागली शेतकऱ्यांसाठी अनेक योजना आणण्यात आल्या, पॅकेजची घोषणा करण्यात आली परंतु आत्महत्येचे सत्र काही केल्या थांबताना दिसत नाही. जागतिकीकरणात त्याचा टिकावा लागणार नाही त्याचे मरण अटळ आहे, ही जाणीव साहित्यातून व्यक्त व्हायला लागले. सामाजिक भान ठेवून लेखन करणारे साहित्यीक त्यांच्या लेखनीतून व्यक्त व्हायला लागले जागतिकीकरणात "माझी कविता" यात कवी उत्तम कांबळे म्हणतात

*शेताच्या काळजावरील।*
*असंख्य भेगांवर अश्रु गाळत।*
*बांधावरून फिरणारि माझी कविता।*
*जागतिकीकरणाच्या लाटेत।*
*हातातून निसटणारी सबसिडी।*
*गच्च पकडण्याचा प्रयत्न करत होती।*

जागतिकीकरणाच्या लाटेत सबसिडी कमी करण्याचा दबाव आहे. कत्तलखान्या कडे जाणाऱ्या जणांवराना जग खोटे आहे असा दिलासा देत बँकच्या कर्जखाली दबलेल्या आत्महत्या करणाऱ्या बळीराजाची संख्या ती मोजत होती. बळीराजाच्या मृत्यूची अनेक कारणे सरकार सांगण्याचा प्रयत्न करत होती कोणी अति व्यसनाणे गेला, विषारी वनस्पती खाल्ल्याने गेला, जगण्याचे तंत्र विसरल्या मुळे गेला अशा अनेक प्रकारे कारण मीमांसा केली जाते. सरकार आपली जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करतो शेतकऱ्यांच्या प्रश्नांना

सोयीस्कर रित्या बगल दिली आहे. हे राजकारण फार असंवेदन पद्धतीने चालत असते हे सर्व बघून कवी अस्वस्थ होतो.

*त्याचा मरणाला।*
*आत्महत्या म्हणता येणार नाही।*
*कारण आत्महत्येच पेटंट घेण्यासाठी।*
*त्यानं अर्जच केला नव्हता मुळी।*

शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नाला असंवेदनशील पद्धतीने हाताळणाऱ्या प्रवृत्तीच्या डोळ्यात झणझणीत अंजन कवीने घातले आहे. पण नादारीचा अर्ज मात्र त्यांनी केला होता. जुनं कर्ज नवा करा असा त्याचा आग्रह होता पीक न आल्यामुळे सर्व पैसा कर्ज फेडण्यात गेला घरी लग्नाला आलेली मुलगी वयस्क व्हायला लागली. तिच्या लग्नाची चिंता त्याला सतावत होती यंदा तिचं लग्न करायचं त्याने ठरवले होते. नापिकीमुळे ते होऊ शकलं नाही, ही सर्व सत्य परिस्थिती होती. पण ती समजून नघेता काय झाले, प्रत्येक्षात काय झले हे सांगताना कवी म्हणतो.

*विरोधकांनी मात्र।*
*सत्य समजून न घेता।*
*त्याच्या डेड बॉडीवर।*
*कफना ऐवजी राजकारणच पांघरलं।*

यवतमाळ जिल्ह्यातील बोरी अरब या लहानशा गावात शेतकरी कुटुंबातील कवी शंकर बडे हे विदर्भातील शेतकऱ्यांचे दु:ख वेदना मांडणारे महत्त्वाचे कवी "शेतकरी राजा" ही त्याची शेतकऱ्यांची व्यथा वेदना सांगणारी महत्त्वाची कविता आहे.

*घरी मोत्याच्या राशी। पोट रिकामं।*

घरी धनाच्या राशी आहेत पण भाव नाही, त्यामुळे पोट रिकामच राहिलं असं फुटक नशीब कोणाचं नसेल. एकीकडे या शेतकऱ्याला राजा म्हटलं जातं पण हे म्हणणे त्याची परिस्थिती बघत त्याला हिणवल्यासारखं वाटतं. कारण त्याच्या अंगात फाटक धोतर आहे आणि त्याच्या पत्नीला लुगड्याला बारा काठी आहेत. ही त्याची अवस्था आहे शेतकरी त्याच्या शेतात अपार कष्ट घेतो ऊन वारा थंडी याचा विचार नकरता गाटा तुडवत जातो, पण नशिबाला चेव येत नाही, नशीब पालटत नाही. सुगीचे दिवस आल्यावर आपल्या मनासारखे होईल असे त्याला वाटते हल्या दवुन दूध निघत नाही. त्याप्रमाणे शेतात कितीही राबले तरी परिस्थिती बदलत नाही. अशा वांझोंट्या स्वप्नात जीव झुरतो, मनाची स्थिती भूल थापीला भुललेल्या हरणासारखी होते. हमीभावाच्या केवळ गप्पा असतात प्रत्यक्षात मात्र हातात काहीच लागत नाही.

लक्ष्मण महाडिक हे सुप्रसिद्ध कवी असून त्याचा "कुणब्याची कविता" हा काव्यसंग्रह शेतकऱ्याच्या जीवनाची व्यथा सांगणारा आहे. त्यांच्या "कोरडी बोंब" "सातबाराची नोंद" यासारख्या कवितेतून शेतकऱ्याची व्यथा आली आहे. "सातबाराची नोंद" ही कविता शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारे दु:ख व्यथा मांडताना उपरोधी शैलीचा वापर त्यांनी केलेला आहे.

*बापाच्या मयती नंतर।*
*त्याच्या मृत्यूची सरकारी दप्तरी नोंद करताना।*
*तलाठ्याला द्यावी लागते दक्षिणा।*
*घालाव्या लागतात प्रदक्षिणा।*
*सरकारी कचेऱ्यात।*

सरकारी कचऱ्यातील भ्रष्टाचाराची वास्तवता कवीने अधोरेखित केलेली आहे. मृत्यूचे नोंद करण्यासाठी सुद्धा लाच द्यावी लागते, चकरा माराव्या लागतात, हे वास्तव आहे. हा सोपस्कार करू नये असे ठरवले तर बाप मरून सुद्धा सरकारी कचऱ्यात जिवंत राहील कारण मृत्युपत्राशिवाय तो कार्यालयीन व्यवहारात मयत मानला जात नाही. त्यामुळे श्रद्धेने घातलेल्या श्राद्धाला अर्थ राहणार नाही. कवी उपरोधाने म्हणतो खरंतर आपण सारेच तलाठ्याच्या सौजन्याने बापाचं बोट सोडून उतरत जातो. सातबाराच्या अज्ञात बेटावर बापाचा वारसा म्हणून.

हा सर्व घटनाक्रम पाहून शेतकऱ्यांच्या मुलाच्या मनात येते पुढे आपले सुद्धा असेच थडगे बांधले जाईल आणि नोंद केली जाईल. 6/5 ला आपल्या भोवती आळ

मारून आपल्या पिल्लांना मोकळे उडवण्यासाठी. भविष्यात सुद्धा ही व्यवस्था बदलली नाही तर वडिलांच्या वाटेला आलेली अवहेलना मुलांच्या वाट्याला येईल की काय ही भीती वाटते.

शेतकरी हा अन्नदाता आहे पण त्याचे उद्या शेती करणे सोडले तर काय होईल आपल्याला खायला अन्न नाही तरी मिळेल काय "पेरा" या इंद्रजीत भालेराव यांच्या कवितेतून हे वास्तव्य मांडणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलाचे दुःख त्यांनी या कवितेत मांडले आहे. शेतकरी पेरणी करतो कधी पिक येते कधी येत नाही त्यातून त्याचे कर्जबाजारी पण वाढत जाते. याला कोणाची साथ मिळत नाही त्यामुळे तो आपला सात्वीक संताप व्यक्त करतो.

*सांगा माझ्या बाबांना नाही केला पेरा।*
*तर तुम्ही काय खाल धतुरा।*

त्याच्या वडिलाने आत्महत्या केली. त्यामुळे मुलाने आपले दुःख खंत या संतापातून व्यक्त केले आहे. पण आमच्याबद्दल तुम्हाला साधी सदिच्छा नाही, आत्मीयता कोणी दाखवत नाही त्याच्या दुःखाची जाणीव ठेवली जात नाही. जर तुमच्या मनात आमच्याबद्दल सदिच्छा असती तर तुम्ही आमच्या घामाचे मोल केलं असतं. मग आम्ही सुद्धा तुमच्यासाठी काळीज आणखी खोल केलं असतं शेतकरी मुबलक अन्न पिकवून सुद्धा उपाशी राहतो, आणि कोणी आयतं खाऊन मात्र सर्व अनायसे प्राप्त करतो. पंचमहाभूताप्रमाणे शेतकरी सुद्धा सहावं तत्व आहे, पण आपल्याला त्याचं महत्त्व नाही. आपल्याला त्याच्याकडून सर्व फुकट पाहिजे असते. त्याच्या घामाचा योग्य मोबदला आपण द्यायला तयार नसतो. कारखान्यात ज्वारी पिकत नाही आणि कारखान्याचा माल सुद्धा कोणी फुकट देत नाही. आपण अन्नदाता आहोत साऱ्या जगाचे पालनपोषण करावे असे त्याला वाटते पण आता त्याच्या जीवनाचा पारा उडुन गेलेला आहे. ही व्यथा शेवटी कवीने व्यक्त केली आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1) पेरा - इंद्रजीत भालेराव, जनशक्ती वाचक चळवळ 2010
2) कुणब्याची कविता - लक्ष्मण महाडिक, शब्दालय प्रकाशन
3) काव्यधारा – सं पा डॉ. केशव फाले, प्रशांत पब्लिकेशन प्रथम आवृत्ती